**कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदयाखाली**
**अर्ज क्र.१८/२०२१ मधील निशाणी क्र.५ वरील आदेश**

CNR – **MHKO130007452021**
( पारीत दिनांक – ०८/०३/२०२२)

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार क्र. १ ते ३ यांनी कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करणारा कायदा, २००५ मधील कलम २३ नुसार अंतरिम पोटगी मिळण्याकरीता, तसेच घरात राहण्याचा आदेश मिळण्याकरीता व इतर संरक्षणात्मक आदेश मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदारांच्या कथनानुसार, अर्जदार क्र. १ यांचा विवाह गैरअर्जदार क्र. १ यांच्याशी दिनांक १०/०७/२००८ रोजी संपन्न झाला आहे. लग्न संबंधातून अर्जदार व गैरअर्जदार यांना अर्जदार क्र. २ व ३ ही अपत्ये झाली आहेत. गैरअर्जदार क्र. २ हे अर्जदार क्र. १ चे सासरे असून गैरअर्जदार क्र. ३ या सासू आहेत. गैरअर्जदार क्र. ४ ते ६ या नणंद असून गैरअर्जदार क्र. ५ हा गैरअर्जदार क्र. ४ चा पती आहे.

३. अर्जदारांच्या पुढील कथनानुसार, अर्जदार क्र. १ यांचा गैरअर्जदार यांच्याशी विवाह झाल्यानंतर सुरुवातीचे काही महिने गैरअर्जदारांनी तिला व्यवस्थित नांदविले. तथापि, लग्नानंतर सहा महिन्यानंतर गैरअर्जदार क्र. २ ते ६ यांच्या सांगण्यावरुन गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदार क्र. १ यांना लग्नात योग्य तो संसारसेठ दिलेला नाही, मानपान केला नाही म्हणून छळ करण्यास सुरुवात केली. गैरअर्जदार हे अर्जदार क्र. १ हिला उपाशी पोटी ठेवून शिवीगाळ करुन तिला अपमानास्पद बोलत होते. गैरअर्जदार क्र. १ हे सद्यस्थितीत एस.टी. महामंडळामध्ये चालक म्हणून नोकरीस असून ते सध्या कागल डेपोमध्ये नोकरी करतात. गैरअर्जदार क्र. १ यांची एकत्रित वर्तणूक पाहता, ते अर्जदार क्र. १ यांच्याशी कधीही व्यवस्थित वागत नव्हते, तसेच ते अर्जदार क्र. २ व ३ यांच्याकडे व्यवस्थित लक्षही

देत नव्हते. गैरअर्जदार क्र. १ यांची बाहेरील वर्तणूक देखील चांगली नव्हती. अर्जदार क्र. १ यांना प्रसुती झाल्यानंतर गैरअर्जदार क्र. १ ते ३ हे कधीही जन्मलेल्या मुलांना वेळेत पाहायला येत नव्हते, तसेच अर्जदार यांना सासरी लवकर घेवून जात नव्हते. सदरच्या होणा–या त्रासामुळे अर्जदार क्र. १ यांचे वडील व गैरअर्जदार यांच्यामध्ये समझोता होवून त्यांनी बाहेर विभक्त राहण्याचे ठरविले होते. त्यानुसार अर्जदार या विभक्त राहिल्यानंतर देखील गैरअर्जदार यांनी अर्जदार यांना त्रास दिलेला आहे. अर्जदारांच्या कथनानुसार, गैरअर्जदार क्र. १ यांनी वेगळे घर बांधूया या कारणास्तव अर्जदार यांना माहेरहून पैसे आणण्याकरीता भाग पाडले होते.

४. अर्जदारांच्या पुढील कथनानुसार, गैरअर्जदार क्र. १ यांना कागल एस.टी. डेपोमधील पूजा धनाजी घाटगे हिच्याशी लग्न करायचे असल्याने ते अर्जदार क्र. १ हिला ''तु घटस्फोट दे' असे सांगत असतात. त्या कारणास्तवही गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदार क्र. १ यांना मारहाण केली आहे. अर्जदाराने गैरअर्जदाराकडून होणा–या त्रासास कंटाळून वेळोवेळी पोलीस ठाणेला देखील तक्रार केली आहे. तथापि, त्याचा कोणताही परिणाम गैरअर्जदार यांच्यावरती झालेला नाही. सद्यस्थितीत, अर्जदार क्र. २ हा इयत्ता ७ वी मध्ये शिकत असून, अर्जदार क्र. ३ ही इयत्ता ४ थी मध्ये शिकत आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांना गैरअर्जदार यांनी घराबाहेर काढल्याने अर्जदार यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे व सद्यस्थितीत अर्जदार ही त्यांच्या वडीलांच्या घरी राहत आहे.

५. अर्जदारांच्या पुढील कथनानुसार, गैरअर्जदार क्र. १ यास मासिक रक्कम रुपये ३५,०००/– इतका पगार आहे. त्याच्यावर कोणीही अवलंबून नाही. गैरअर्जदार यांची पसारेवाडी, ता. कागल येथे २ घरे आहेत. तसेच इतरही स्थावर मिळकती गैरअर्जदारांच्या नावे आहेत. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ कडून अर्जदार क्र. १ यांना रक्कम रुपये १०,०००/– व अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रत्येकी रक्कम रुपये ५,०००/– अशी

अंतरिम पोटगी, तसेच पसारेवाडी, ता. कागल मधील गैरअर्जदार क्र. १ यांच्या नावे असलेल्या ग्रामपंचायत नंबर ७२४ मध्ये राहण्यास देणेबाबतचा आदेश व्हावा अशी विनंती करण्याकरीता व गैरअर्जदारामार्फत कोणताही त्रास होवू नये असा संरक्षणात्मक आदेश मिळण्याकरीता, सदरचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.

६. गैरअर्जदार क्र. १ ते ५ यांनी प्रस्तुत अर्जास निशाणी क्र. १३ अन्वये त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. गैरअर्जदार यांच्या कथनानुसार, अर्जदार कथन करतात त्याप्रमाणे त्यांना कोणताही त्रास गैरअर्जदार यांनी दिलेला नाही. गैरअर्जदार क्र. १ यांना रक्कम रुपये ३५,०००/– इतका पगार नाही. अर्जदार हिचा विवाह गैरअर्जदार क्र. १ यांच्याशी झाल्यानंतर दिनांक १४/०५/२००९ रोजी अर्जदार क्र. २ यांचा जन्म झाला. मात्र, त्यानंतर अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ याला घरी घेवून आल्यानंतर तिला घेण्यावरुन अर्जदार क्र. १ हिने गैरअर्जदार क्र. १ व त्यांचे आई वडील यांच्याबरोबर वाद घालण्यास सुरुवात केली. अर्जदार क्र. १ यांचा स्वभाव तापट व भांडखोर आहे. अर्जदार क्र. १ यांच्या बदलत्या स्वभावाची जाणीव गैरअर्जदार यांनी अर्जदार यांना वेळोवेळी करुन दिली होती व आहे. अर्जदाराची वर्तणुक गैरअर्जदार क्र. ४ व ६ अर्थात अर्जदारांची नणंद यांच्याशी कधीही चांगली नव्हती व नाही. तथापि, अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ यांचा संसार सुरळीत चालावा, या एका हेतूखातिर गैरअर्जदार क्र. ४ व ६ या त्यांचा होणारा अपमान सहन करत होत्या.

७. गैरअर्जदारांच्या पुढील कथनानुसार, गैरअर्जदार क्र. १ हे सन २०१० साली एस.टी. महामंडळामध्ये चालक म्हणून नोकरीस लागल्यानंतर त्यांना कधी सकाळची किंवा संध्याकाळची डयुटी लागत होती. त्यावेळेस गैरअर्जदार क्र. १ यांना डबा देखील अर्जदार क्र. १ या करुन देत नव्हत्या. गैरअर्जदार क्र. १ यांची आई या उतरत्या वयात देखील गैरअर्जदार क्र. १ यांना ते डयुटीसाठी जात असताना चहा व डबा करुन देत होत्या.

अर्जदार क्र. १ यांचे, गैरअर्जदार क्र. २ व ३ यांच्यासोबतचे वर्तन हे उध्दटपणाचे होते. अर्जदारांनी व त्यांच्या आई वडीलांनी अर्जदार क्र. २ यांच्या बारश्याची बाब गैरअर्जदारापासून पूर्णपणे लपविली होती. गैरअर्जदार हे अर्जदार क्र. २ याला पाहण्याकरीता दवाखान्यात गेल्यानंतर अर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. २ चा चेहरा देखील गैरअर्जदारांना दाखविला नव्हता. अर्जदारांच्या सांगण्यावरुन कोणत्याही गोष्टीसाठी शहानिशा न करता पोलीसांनी गैरअर्जदार क्र. १ यास मारहाण केली आहे. त्यामुळे सदरच्या मारहाणीचा परिणाम गैरअर्जदार यांच्या मनावरती झाला आहे. अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ हे भाडयाने राहण्यास असताना अर्जदार क्र. १ यांचे घर मालकीणीशी देखील कधीही पटलेले नाही. अर्जदार क्र. १ हिचे कोणाशीही पटत नव्हते.

८. गैरअर्जदार यांनी त्यांच्या नावावर कर्ज काढलेले असून सद्यस्थितीत ते त्यांचे कर्ज फेडत आहेत. तसेच गैरअर्जदार यांनी घरासाठी देखील कर्ज काढलेले होते. त्या घराचे हप्ते गैरअर्जदार भरत आहेत. गैरअर्जदार यांना स्वतःचा पगार नाही. अर्जदारांनी स्वतःहून गैरअर्जदारांचा त्याग केला आहे. गैरअर्जदार क्र. २ हे सतत आजारी असतात. त्यांच्यावर उपचाराकरीता गैरअर्जदार क्र. १ यांचे बरेचसे पैसे खर्च होतात, गैरअर्जदारावर त्यांच्या आई वडीलांची जबाबदारी आहे. त्यामुळे वरील सर्व कारणे नमूद करुन गैरअर्जदारानी अर्जदार यांचा दाखल केलेला अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

९. अर्जदार क्र. १ ते ३ यांच्यातर्फे विधिज्ञ श्री.जी.व्ही.चौगुले व गैरअर्जदार क्र. १ ते ६ यांच्यातर्फे विधिज्ञ श्री.ए.जे.देसाई यांचा युक्तिवाद ऐकला.

१०. प्रस्तुतच्या अर्जातील कथने व त्यावरील म्हणणे विचारात घेता, या न्यायालयाच्या निष्कर्षासाठी खालील मुद्दे उपस्थित झाले व त्यावरील निष्कर्ष कारणमिमासेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात आलेले आहेत–

| अ.क्र. | प्रश्न बिंदू (**Points**) | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदारांनी तिच्यावरती गैरअर्जदारांमार्फत कौटुंबिक हिंसाचार झाला हे प्रथमदर्शनी सिध्द केले का ? | होय. |
| २. | अर्जदार ही तिच्यावरती झालेल्या कौटुंबिक हिंसाचाराकरीता तिच्याकरीता व अर्जदार क्र. २ व ३ करीता अंतरिम पोटगी रक्कम गैरअर्जदाराकडून मिळण्यास पात्र आहे का ? असल्यास किती ? | अंशतः होकारार्थी |
| ३. | अर्जदार ही गैरअर्जदाराकडून घरभाडे मिळण्यास पात्र आहे का ? | अंशतः होकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**– कारणमिंमासा –**

**प्रश्न बिंदू क्र. १ ते ३ बाबतः–**

११. प्रस्तुत प्रकरणी अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ तसेच इतर गैरअर्जदार यांचे नातेसंबंध परस्परांना मान्य आहेत. किंबहूना, त्याबाबतीत काहीही दुमत नाही असे दिसते.

१२. प्रस्तुत प्रकरणी उभय पक्षकारांनी एकमेकांवरती अत्याचार केला आहे अशी उभय पक्षाची केस आहे असे दिसून येते. अर्जदारांनी गैरअर्जदारांनी तिच्यावर केलेल्या अत्याचाराबद्दल पोलीस ठाणे, कागल येथे अदखलपात्र गुन्हा दाखल करुन तक्रार दाखल केली होती असे त्यांनी दाखल केलेल्या अदखलपात्र गुन्हयाच्या अहवालावरुन दिसून येते. अर्जदारांवर गैरअर्जदारांकडून अत्याचार होत आहेत असे अर्जदारांचे कथन आहे, तर सदरची बाब गैरअर्जदारांनी नाकारलेली आहे.

१३. अर्जदारांनी पोलीस ठाणेकडे दाखल केलेल्या अदखलपत्र गुन्हयाच्या अहवालाची यादी पाहता त्यामध्ये दिनांक २३/०५/२०२१ रोजी गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदारास मारहाण केली होती असे नमूद केले आहे. निश्चितपणे सद्यस्थितीमध्ये उभय

बाजूंचा पुरावा अजून चालू होण्याचा आहे, सदरचे प्रकरण हे अंतरिम स्थितीत आहे. उभय बाजूंच्या वादाच्या अनुषंगाने, गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदारापासून तिचे विवाह विच्छेदन होवून मिळावे याकरीता कोल्हापूर येथील वरिष्ठ स्तर न्यायालयामध्ये हिंदू विवाह विच्छेदन अर्ज नंबर ३०२/२०२१ हा दाखल केला आहे असे दिसून येते.

१४. अर्जदारांच्या एकंदरीत कथनांचे अवलोकन करता, त्यांनी दाखल केलेल्या अदखलपात्र गुन्हयाच्या अहवालाची प्रत पाहता, तसेच अर्जदार व तिच्या वकीलांनी गैरअर्जदार क्र. १ याला व गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार हिला पाठविलेली नोटीस यांचे अवलोकन करता, उभय पक्षकारांमध्ये कौटुंबिक स्वरुपाचे वाद उपस्थित झाले आहेत ही बाब प्रथमदर्शनी स्पष्टपणे दिसून येते. सद्यस्थितीमध्ये अर्जदार ही तिच्या वडीलांकडे राहण्यास आहे असे तिचे कथन आहे. सदरची बाब गैरअर्जदारांनी नाकारलेली नाही. अर्जदाराने तिच्यावर झालेल्या अन्यायाबाबत पोलीस ठाणेला दाद मागितल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जदारांवर गैरअर्जदारांकडून प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाला आहे असे दिसून येते.

१५. प्रस्तुत प्रकरणी अर्जदार क्र. २ हा इयत्ता ७ वी मध्ये शिकण्यास आहे. त्याबाबत दूधगंगा विद्यालय यांचे प्रमाणपत्र अभिलेखावरती दाखल आहे. तसेच अर्जदार क्र.३ ही जयसिंगराव घाटगे विद्या मंदिर, कागल येथे इयत्ता ४ थी मध्ये शिकण्यास आहे. याबाबतीत त्या विद्यालयाचे प्रमाणपत्र अभिलेखावरती दाखल आहे. निश्चितपणे वरील बाबींचा विचार करता, अर्जदार क्र. २ व ३ हे सद्यस्थितीत शिक्षण घेत आहेत ही बाब स्पष्ट होते.

१६. अर्जदारांनी गैरअर्जदारांची स्थावर मिळकत दाखविण्याकरीता कागल व पसारेवाडी येथील स्थावर मिळकतीचे काही उतारे दाखल केले आहेत. त्यांचे अवलोकन करता, निश्चितपणे कागल येथील गट नंबर ३४३/१ व ३४३/१४ व ३४३/१९ मधील

मिळकती या गैरअर्जदार क्र. २ यांच्या नावे असल्याचे तसेच गट नंबर ३८१/२ मधील मिळकती या गैरअर्जदार क्र. १ व ३ यांच्या संयुक्तिक नावे असल्याचे दिसून येते. कागलमधील कागल नगरपरिषद अंतर्गत असणा–या घर मिळकतीचे उतारे अर्जदारांनी अभिलेखावरती दाखल केले आहेत. त्याचे अवलोकन करता, मिळकत नंबर ७२४ ही विनोद गणपती पसारे यांच्या नावे असल्याचे दिसून येते. तसेच मिळकत नंबर ३६९ ही गैरअर्जदार क्र. २ यांच्या नावे असल्याचे दिसून येते. गैरअर्जदार क्र. १ यांचे उत्पन्नाबाबत एस.टी. महामंडळाचे ऑक्टोबर–२०२१ चे पगारपत्रक गैरअर्जदारांनी दाखल केले आहे. त्याचे अवलोकन करता, गैरअर्जदार क्र. १ यास रक्कम रुपये २१,६९६/– इतका पगार असल्याचे दिसून येते. सदरचे पगारपत्रक हे ऑक्टोबर–२०२१ या महिन्यातील आहे असे दिसते.

१७. निश्चितपणे अर्जदार यांनी गैरअर्जदार यांच्या असणा–या स्थावर मिळकती व त्यांचे नमूद उत्पन्न याबाबतीत प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावरती दाखल केला आहे. अर्जदार यांनी त्यांचे मालमत्ता व जबाबदारीबाबतचे शपथपत्र (ॲफिडेव्हीट) निशाणी क्र.१२ कडे दाखल केले आहे, तर गैरअर्जदार यांनी त्यांचे शपथपत्र निशाणी क्र. १५ कडे दाखल केले आहे. अर्जदार यांनी त्यांच्या शपथपत्रामध्ये त्यांचे एकंदरीत खर्चाचे विश्लेषण दिले असून मुलांचे शिक्षणावरती त्यांना दरमहा रक्कम रुपये १०,०००/– इतका खर्च असल्याचे त्यांचे कथन आहे. अर्जदार यांना इतर कोणतेही उत्पन्न नसून त्या त्यांच्या नमूद खर्चाबाबत गैरअर्जदार यांच्यावरती सर्वस्वी अवलंबून आहेत असे त्यांचे कथन आहे. याउलट, गैरअर्जदारांनी देखील त्यांचे शपथपत्रामध्ये त्यांच्यावरती त्यांचे आई वडील यांची जबाबदारी असून त्यांच्यावरती त्यांना दरमहा रक्कम रुपये ४,०००/– ते ५,०००/– इतका खर्च करावा लागतो असे कथन केले आहे. तसेच अर्जदारांचा स्वतःचा खर्च रक्कम रुपये २,०००/– इतका असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

१८. गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. २ व ३ यांच्या अन्नांच्या खर्चाकरीता दरमहा रक्कम रुपये १,०००/– व शैक्षणिक खर्चाकरीता वार्षिक रक्कम रुपये १,०००/– खर्च म्हणून दिलेला आहे. गैरअर्जदार यांच्यावर एस.टी. बँकेचे रक्कम रुपये ७,४५,०००/– व ॲक्सिस बँकेचे रक्कम रुपये १,९०,०००/– व श्रीनाथ नागरी सहकारी पतसंस्था येथील रक्कम रुपये ७०,०००/– कर्ज असल्याचे त्यांनी नमूद केले आहे व त्या संदर्भातील कागदपत्रे देखील त्यांनी अभिलेखावरती दाखल केली आहेत. गैरअर्जदारांवर एकूण रक्कम रुपये १०,५०,०००/– इतके कर्ज असल्याचे व ते एकूण मिळून दरमहा रक्कम रुपये १७,०००/– इतका मासिक हप्ता भरत असल्याचे त्यांचे कथन आहे.

१९. निर्विवादीतपणे, गैरअर्जदारांचा पगार रक्कम रुपये २१,०००/– असल्याचे अभिलेखावरती आले आहे. गैरअर्जदारांचे महिन्याला रक्कम रुपये १७,०००/– वजा होतात असे त्यांचे कथन आहे. किंबहूना, त्यांचा ऑक्टोबर–२०२१ या महिन्याचे पगारपत्रक अभिलेखावर दाखल आहे. त्याचे अवलोकन करता, गैरअर्जदारांच्या पगारातील सर्व रक्कम वजा होवून गैरअर्जदारांच्या हातात रक्कम रुपये २,४३१/– इतकी रक्कम मिळाल्याचे त्यात नमूद आहे. तथापि, सदरचा दाखला हा केवळ ऑक्टोबर–२०२१ या महिन्यापुरता मर्यादित आहे. गैरअर्जदार यांनी त्यास इतर महिन्यातून मिळणा–या उत्पन्नाचे दाखले या कामी दाखल केले नसल्याचे दिसून येते. गैरअर्जदारांच्या नावे इतर शेत जमिनी असून त्यांनाही त्यातील निश्चितपणे उत्पन्न मिळत असणार आहे. शेत जमिनीचे उतारे अभिलेखावरती दाखल आहेत. त्याचे अवलोकन करता, गैरअर्जदार क्र. १ यांच्या नावे शेत जमिनी आहेत असे दिसून येते. त्यामुळे गैरअर्जदार यांनी शेतजमिनीतून निश्चितपणे काही उत्पन्न मिळत असणार ही बाब स्पष्ट आहे. गैरअर्जदारांच्या नावे स्वतःचे राहते आरसीसी घर असल्याचे देखील अभिलेखावर आले आहे. किंबहुना, त्याबाबतीत कागदपत्रे अभिलेखावर दाखल आहेत.

२०. वरील सर्व कारणांचा विचार करता, अर्जदार सद्यस्थितीत त्यांच्या माहेरी राहण्यास आहेत व त्यांना स्वतःचे असे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही ही बाब लक्षात घेता, अर्जदारांचा दैनंदिन खर्च चालण्याकरीता गैरअर्जदार क्र. १ हे काही अंशी रक्कम रुपये पोटगी स्वरुपात अर्जदार क्र. १ ते ३ यांना नक्कीच देण्यास पात्र आहेत असे माझे मत आहे. त्यामुळे सद्यस्थितीत वाढलेली महागाई, अर्जदारांच्या राहण्याचा दर्जा, अर्जदार क्र. २ व ३ यांच्या शिक्षणाचा खर्च, या सर्व बाबींचा विचार करता, खालीलप्रमाणे आदेश करणे योग्य राहील असे मला वाटते–

**– आ दे श –**

१) गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदार क्र. १ यांना प्रतिमहिना अंतरिम पोटगी पोटी रक्कम रुपये २,५००/–, अर्जदार क्र. २ व ३ यांना पोटगी पोटी रक्कम रुपये १,५००/– प्रत्येकी ही प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्या तारखेपासून दयावी.

२) अर्जदारांना राहण्याकरीता कागल येथील घर नंबर ७२४ मधील मिळकत प्रस्तुतच्या अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत राहण्याकरीता दयावी व तसे शक्य नसल्यास घर भाडेबाबत स्वतंत्र रक्कम रुपये २,०००/– प्रतिमहिना अर्ज दाखल तारखेपासून दयावी.

३) अर्जदारांना गैरअर्जदारांनी कोणत्याही प्रकारे दमदाटी व त्रास देवू नये असे आदेश त्यांच्याविरुध्द देण्यात येतात. त्याबाबतीत सदर आदेशाची एक प्रत संरक्षण अधिकारी व कागल पोलीस ठाणेला पाठविण्यात यावी.

४) अर्जदारांची गॅस सिलेंडरचे पैसे देणेबाबतची व लाईट कनेक्शनचे पैसे भरणेबाबतची विनंती नामंजूर करण्यात येते.

५) खर्चासंबंधी कोणताही आदेश नाही.

Amol Bharat Jawale
Digitally signed by Amol Bharat Jawale
Date: 2022.03.21 17:20:00 +0530

**(अमोल भारत जवळे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कोर्ट नं. १, कागल.

कागल.
दिनांक – ०८/०३/२०२२